| MHRG080006802024 | फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.५०/२०२४<br>( रुपाली सुतार वि. रुपेश सुतार ) |
|---|---|

## निशाणी क्र.५ वरील आदेश

१. अर्जदाराने मुख्य अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे. सदर निशाणी क्र.५ चा अर्ज अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात असे कथन आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक २३/०२/२०२३ रोजी मौजे साई हॉल एच.ओ.सी.कॉलनी मोहोपाडा रसायनी ता. खालापूर येथे आई वडीलांच्या पसंतीने व हिंदू सुतार धर्म समाजाच्या रितिरिवाजा प्रमाणे संपन्न झालेला आहे. सदर विवाहातून अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना एकही अपत्य नाही. सामनेवाला क्र.१ हे अर्जदारचे पती, सामनेवाला क्र.२ ह्या अर्जदारच्या सासू, सामनेवाला क्र.३ हे अर्जदारचे मोठे सासरे व सामनेवाला क्र.४ ही अर्जदारची मोठी नणंद आहे. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी सासर कडील घरी सत्यनारायणाची पुजा असल्यामुळे घरी भजनाचा कार्यक्रम होता त्यावेळी सामनेवाला क्र.२ यांनी अर्जदारला २५ ते ३० जणांचा चहा ठेवण्यास सांगितले त्यावेळी नवीन सुन असल्यामुळे अर्जदारला किचनमध्ये कोणती वस्तू कोठे ठेवली आहे हे माहीत नव्हते त्यामुळे अर्जदारचा गोंधळ झाला होता तरी सुध्दा अर्जदारच्या मदतीला कोणीही आले नाही. त्यादिवशी संध्याकाळी घरातील सर्व कामे उरकल्यानंतर अर्जदारने झोपण्यासाठी रुमची विचारणा केली असता, त्यावेळी सामनेवाला क्र.१ ने दोघांचे अंथरुण किचनमध्ये टाकण्यास सांगितले त्यावेळी अर्जदारला धक्का बसला. सामनेवाला क्र.१ याचे स्वतःचे दोन रुमचे घर असून सुध्दा सामनेवाला क्र.१ याने वन आर.के. घरामध्ये किचन मध्ये झोपण्यास भाग पाडले. त्यावेळी अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्यामध्ये केवळ एक कापडी पडदा व त्या पलिकडे सासू सासरे व लहान दिर झोपलेले असतांना त्या परिस्थिती अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना एकत्र किचनमध्ये रहावे लागत असे.

३. दिनांक ०३/०३/२०२३ रोजी अर्जदार व सामनेवाले हे सर्वजण शिमग्यासाठी गावाकडे एकत्र गेले होते. त्यावेळी गावाकडील घर हे मोठे असून सुध्दा झोपण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नव्हती. सामनेवाला क्र.१ अर्जदारच्या मनाचा विचार न करता तिच्या मनाविरुध्द तिची

इच्छा नसतांना जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवत होता. दिनांक १६/०३/२०२३ रोजी अर्जदारच्या आत्याच्या मुलीच्या लग्नासाठी अर्जदार ही तिच्या मोठया भावा सोबत माहेरी आली. त्यावेळी सामनेवाला क्र.१ ला सुट्टी नसल्यामुळे तो हळदीच्या दिवशी येणार होता त्यावेळी कार्यक्रमाच्यावेळी अर्जदारने मेकअप केला असल्यामुळे सामनेवाला क्र.१ याला राग आला. त्यानंतर काही दिवसांनी गुढी पाडव्याच्या सनाच्या दिवशी अर्जदार हिला मासिक पाळी आली होती त्या गोष्टीवरुन सुध्दा अर्जदार हिला सामनेवाला यांनी घालून पाडून बोलण्यास सुरवात केली त्यावेळी अर्जदार ही माहेरी असल्यामुळे सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारला फोनवरती खुप बडबड केली. सासरच्या घरी दररोज अशी पध्दत होती की, घरातील सर्व कामे करुन संध्याकाळी सामनेवाला क्र.४ हिच्या घरी जायचे व रात्री ९ वाजता येवून रात्रीचे जेवण बनवायचे हे असे अर्जदारला दररोज करावे लागत असे सदर विषयी अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याच्याकडे सांगितले असता, सामनेवाला क्र.१ हा खुप चिडला व त्याने अर्जदारला अश्लील शिवीगाळ केली तसेच घालून पाडून बोलून सामनेवाला क्र.१ याने अर्जदारचा गळा दाबला व असे म्हणले की, तुझी ही नाटक येथे चालणार नाही, आम्ही बोलतो तसे वागायचे, तुझे डोके चालवू नकोस. त्या परिस्थितीमध्ये अर्जदार हिने आपली सुटका करुन घेतली.

४. दिनांक १५/०४/२०२३ रोजी अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे तसेच अर्जदारच्या घरातील नातेवाईक कार्ले येथे फिरायला गेले होते. अर्जदार ही खोपोली मध्ये राहत असल्यामुळे तिला लोणावळयातील काही ठिकाणाची माहिती होती त्यावेळी लोणावळयात उतरल्यानंतर जेव्हा अर्जदार कसे कुठे जायचे हे सांगत होती त्यावेळी सामनेवाला क्र.१ हा अर्जदारला म्हणाला की, लग्ना आधी लोणावळयात खुप उनाडलेली दिसतेस, कुणा सोबत किती वेळा आली होतीस, त्याशिवाय तुला एवढी माहिती कशी, त्यावेळी सामनेवाला क्र.१ हा खुप चिड चिड करत होता. अर्जदार ही ऑनलाईन दिसली तर सामनेवाला क्र.१ हा विचारणा करत असे की, मला तर फोन करायला वेळ मिळत नाही, मग येथे कोणाशी बोलतेस काय बोलतेस असे सामनेवाला क्र.१ संशयी वृत्तीने बोलत असे सामनेवाला क्र.१ व त्याच्या घरातील नातेवाईक यांचा स्वभाव संशयी वृत्तीचा होता. अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे जर कोणत्या कार्यक्रमाला गेले तर सामनेवाला क्र.१ हा सर्वप्रथम अर्जदार हिचा मेकअप पाहत असे तसेच घातलेले कपडे पाहत असे तसेच सामनेवाला क्र.१ याने सुचविल्याप्रमाणे तयार होवून त्याच्यासोबत यावे असा त्याचा आग्रह असायचा दिनांक ०३/०४/२०२३ रोजी अर्जदारच्या चुलत बहिणीच्या हळदीकरिता ती बदलापूर येथे गेलेली असतांना अर्जदारने आपले नातेवाईक बहीण भावंड यांच्या सोबत फोटो काढले असता, त्या गोष्टीवरुन सुध्दा सामनेवाला क्र.१ ला राग येत असे व त्यावरुन सामनेवाला क्र.१ अर्जदारला अश्लील शिवीगाळ करत असे.

५. दिनांक १६/०५/२०२३ रोजी अर्जदार हिचे सहकारी डॉक्टर प्रियंका हिचे लग्न होते परंतु सामनेवाला क्र.१ व घरातील नातेवाईक यांनी लग्नाला जाण्यास विरोध दर्शविला व त्या गोष्टीवरुन वाद विवाद करण्यास सुरवात केली. सामनेवाला क्र.१ ने अर्जदारच्या डोक्यात मारहाण केली. त्यानंतर काही दिवसांनी अर्जदार ही तिच्या माहेरी आली होती. त्यावेळी अर्जदारने तिच्या आईवडीलांना आजवर घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर अर्जदारच्या आई वडीलांनी तिची समजूत घातली व सर्व सासरकडील मंडळींना माहेरी बोलवून घेतले व झालेल्या प्रकारा बाबत सदर व्यक्तीना जाब विचारला असता, त्यांनी सर्व गोष्टी मान्य केल्या. त्यावेळी अर्जदारच्या वडीलांनी पोलीस स्टेशनला जावून रितसर सर्व लिहून घेण्याचा आग्रह धरला परंतु त्यावेळी मोठया भावाने सदर विषयाबाबत मध्यस्थी करुन विषय घरातच मिटविण्याचा सल्ला दिला. त्यानंतर अर्जदार सासरी आली. त्यावेळी अर्जदारच्या असे लक्षात आले की, अर्जदार ही माहेरी जाण्याआधिच सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार हिचा मोबाईल स्कॅन करुन ठेवला होता व अर्जदार कोणाशी काय व किती बोलते याचा तपशील सामनेवाला क्र.१ याचाकडे होता. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचे शारिरीक संबंध चालू असतांना सामनेवाला क्र.१ हा मोबाईमध्ये व्ही.डी.ओ. काढत असतांना अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याच्यावर चिडली त्यावेळी सामनेवाला क्र.१ ने व्ही.डी.ओ. डिलिट केल्याचे नाटक केले. सामनेवाला क्र.१ याचा दररोजच्या शारिरीक संबंधामुळे अर्जदारला अशक्तपणा येत असे या गोष्टीच्या तिच्यावर शारिरीक व मानसिक परिणाम होत असे.

६. दिनांक ०५/०८/२०२३ रोजी अर्जदारच्या वाढ दिवसाच्या निमित्ताने अर्जदारचे आई वडील अर्जदारला भेटायला आले होते. त्यावेळी अर्जदार व सामनेवाल नं.१ हे दोघे माथेरान येथे फिरायला गेले होते. सामनेवाला क्र.१ याचा मित्र दिनेश व त्याची बायको त्यांच्यासोबत होती. त्यावेळी सामनेवाला क्र.१ ने अर्जदारचा मोबाईल त्याच्याकडे ठेवला होता. त्यावेळी सामनेवाला क्र.१ ने अर्जदार हिला ज्यानी वाढ दिवसाच्या शुभेच्या दिल्या होत्या त्यांना रिप्लाय दिले. त्यावेळी सुध्दा सामनेवाला क्र.१ यांना राग आला होता. सामनेवाले हे जरा सुध्दा अर्जदारकडे लक्ष देत नव्हते. शेवटी कंटाळून अर्जदारने सामनेवाला क्र.३ यांना माहेरी जाण्यासाठी विचारले असता ते सामनेवाला क्र.१ यांना विचारुन जा असे म्हणाले त्यावेळी अर्जदार सामनेवाला क्र.१ यांना विचारुन माहेरी आली. त्यावेळी अर्जदारची अवस्था बघून त्याच टेन्शनमध्ये अर्जदारच्या वडीलांचा हार्ट अटॅक येवून मृत्यु झाला. शेवटी सर्व गोष्टींना कंटाळून अर्जदार माहेरी आली, त्यानंतर सुध्दा मिटींग झाली. सामनेवाला क्र.१ हा अर्जदारला म्हणाला की, मला नर्स मुलीशी लग्नच करायचे नव्हते. या गोष्टीचा अर्जदारला शारिरीक व मानसिक त्रास झाला. त्यामुळे अर्जदारला माहेरी रहावे लागत आहे. सामनेवाला क्र.१ हा वेल्सस्पन हाऊस या

कंपनीमध्ये कामाला असून त्याला मासिक २५,०००/- इतके वेतन आहे. सामनेवाला क्र.२ हया गृहीणी आहेत, सामनेवाला क्र.३ हे सुतार काम करत असून त्यांना अंदाजे मासिक ३०,०००/- इतके उत्पन्न आहे. सामनेवाला क्र.१ वर अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. याऊलट अर्जदारला उत्पान्नाचे साधन नाही. त्यामुळे अर्जदाने सदरचा अर्ज तिला सामनेवाला क्र.१ कडून दरमहा १५,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

७. सामनेवाला क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.११ वर म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला क्र.१ याचे असे कथन आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक २३/०२/२०२३ रोजी झालेला आहे परंतु विवाहाचा खर्च रु.२५,०००/- सामनेवाला यांनी अर्जदार यांना दिलेला आहे. हळद उतरवितांना चहा पाणी सामनेवालाल्याच्या बहीण व भाच्यांनी केला त्यावेळी अर्जदार हया स्वइच्छेने मी मदत करते म्हणून आल्या. लग्नाआधी अर्जदारला एक रुम चाळीत आहे तर दुसरी ब्लॉक मध्ये आहे हे दाखविल होते. तेथे चाळीत अर्जदारला रहायचे नव्हते. नाईलाजाने वन रुम किचनमध्ये संसार सुरू केला तसेच काही महिने वेगळे राहू असे देखील सामनेवाला क्र.१ यांनी सुचविले परंतु अर्जदार तयार नव्हती. होळीच्या सणाला अर्जदार व सामनेवाला गेले होते हे सत्य आहे. परंतु तेथे मोठे घर आहे. तेथे कोणतीही जबरदस्ती अर्जदारवर केली नाही. कारण होळीचे देवकार्य होते. तसेच आत्याच्या मुलीच्या लग्नाला उभयपक्ष दोघेही हजर होते कोणतीही वाद विवादाची घटना घडली नाही, मेकअप वरुन बोलाचाली झाली नाही, उलट सामनेवाला हौशिन मेकअप साहित्य अर्जदारास आणून द्यायचा, पती सोबत बोलण्यापेक्षा मोबाईलवर अर्जदार मित्र, मैत्रीणी, नातेवाईकांशी बोलत असे, अर्जदारचा स्वभाव हट्टी आहे, ती कोणतीही गोष्ट मानून समजावून घेत नसे. गुढी पाडव्याच्या वेळचा वृतांत खोटा आहे. कारण अर्जदार ही दिवसभर मैत्रीणी सोबत होती, त्यावरुन अर्जदारास विचारणा केली असता, अर्जदारला शंका वाटत असे, जाब देणार यांची आई आजारी असते. त्यांना डॉक्टरांनी चालावयास सांगितल्यामुळे त्या रोज मुलीकडे जात असतात, अर्जदार हया कधीच सामनेवाला क्र.४ कडे गेल्या नाहीत उलट घरात बसुन राहत असे व कोणाशी मिसळत नसे, स्वयंपाक करतांना धांदल उडत असे, गॅस चालू रहात असे वगैरे लाडात प्रेमात अर्जदारास सामनेवाला व त्याच्या कुटींबीयांनी सांभाळले आहे. मोबाईलवर बोलतांना अर्जदारच्या हातून गॅस वर तेलाने पेट घेतला होता. शेजाऱ्यांनी येवून प्रसंग सावरला.

८. दिनांक १५/०४/२०२३ रोजीचा एकविरा दर्शनाचा प्रसंग खोटा आहे, अर्जदार सासरी संपुर्ण स्वतंत्र होती कधीही सामनेवाला याने अर्जदारवर संशय घेतलेला नाही. सामनेवाले हे नोकरीस मुंबई येथे असल्याने दिवसभर कामावर असता त्यामुळे एकटया अर्जदारच्या हाती

कारभार होता. अर्जदारला राहूल नावाच्या व्यक्तीचा सतत येत असे, त्याचे एस.एम.एस. सामनेवाला यांनी पाहिले त्यावर सामनेवाला यांनी अक्षेप घेतला होता. डॉक्टर प्रियंकाच्या लग्नाला सामनेवाला यांनी आडकाठी केली नाही. कधीही अर्जदारचा फोन सामनेवाला यांनी स्कॅन केलेला नाही. शरिर संबंधाबाबत अपशब्द बोललेले नाही, जबरदस्ती कधीही केलेली नाही. अर्जदार यांची प्रकृती नाजूक होती त्यामुळे त्या सतत आजारी असल्यामुळे त्यांच्यावर दवाखान्यात नेवून उपचार करावे लागत होते. शरिर संबंधासाठी सामनेवाला हे कधीही भुकेलेले नव्हते तसेच अर्जदारास शारिरीक त्रास आहे सध्या मुल ठेवू नये पोटात गाठ आहे असे अर्जदारास डॉक्टरांनी सांगितले होते तसे अर्जदाराने स्वतः सामनेवाला यांना सांगितले. अर्जदारचे वडील हार्ट पेशंट होते त्यामुळे ते गेलेत. त्याला सामनेवाला जबाबदार नाही. अर्जदारला सामनेवाला क्र.१ सोबत कधीही संसार करायचा नव्हता, तसेच मनाविरुध्द त्यांचे लग्न झाले होते म्हणून कोणतेही सबळ कायदेशीर कारण नसतांना अर्जदार दिवाळीच्या वेळेस चुलत भावा बरोबर दिनांक ११/११/२०२३ रोजी निघून गेली आहे ती आज तागायत आलेली नाही. अर्जदारने जातांना कपाटातील सर्व स्त्रीधन म्हणजेच सामनेवाला यांनी दिलेली अंगठी, मंगळसुत्र, कानातील, तिची अंगठी घेवून गेलेली आहे. अर्जदार स्वतः हॉस्पीटलमध्ये कामास आहे. तसेच सामनेवालास २५,०००/- रुपये पगार नाही. त्याच्यावर जेष्ठ नागरीक आई वडील यांची जबाबदारी आहे, वडील कमावत नाहीत व ते आजारी असतात. अर्जदारने सदरचा अर्ज सामनेवाला यांना त्रास देण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराबरोबर संसार सुखाचा व्हावा म्हणून सामनेवाला याने अनेक प्रयत्न केले परंतु अर्जदारला संसार करायचा नाही. तसेच माहेरी निघून जाण्यास कोणतेही सबळ कारण नाही, त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

९. अर्जदारातर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. एम. व्ही. सुरावकर व सामनेवाले तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. सुनिल पाटणकर यांचा युक्तीवाद ऐकला.

| अ.न. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे का? | होय. |
| २. | अर्जदार ही पोटगी रक्कम रुपये दरमहा खर्चासाठी रक्कम रु. १५,०००/- मिळण्यास पात्र आहे का? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | अर्जदार तात्पुरता संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ४. | अर्जदार ही नुकसान भरपाई रक्कम रुपये २० लाख मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५. | अर्जदार ही दरमहा घर भाडयाकरिता रक्कम रु.१०,०००/- इतके अर्थ सहाय्य मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ६. | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

१०. अर्जदाराने प्रस्तुत अर्जा सोबत अभय केंद्र संरक्षण अधिकारी कार्यालय खालापूर यांना दिलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची झेरॉक्स प्रत, लग्न पत्रिकेची झेरॉक्स प्रत, लग्नाच्या फोटोची झेरॉक्स प्रत व अर्जदारच्या दवाखान्याचे कागदपत्र ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदारने निशाणी क्र.१५ वर तिचे वैयक्तिक मालमत्ता संबंधीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोक केले असता, असे दिसून येते की, अर्जदार हिचे शिक्षण १० वी पर्यंत झाले असून ती सध्या मोगलवाडी, पो. खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड येथे राहत आहे. विभक्त झाल्याची तारीख ११/१०/२०२३ अशी आहे, त्यामध्ये तिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जदारने सामनेवाला न.१ हा वेल्सस्पन कंपनी परेल येथे नोकरीला असल्याचे अर्जदारने कथन केले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला याची तालुका खेड, जि. रत्नागिरी व स्वतःचे घर व तीन चार गुठ्ठे जमिन व वन आर के घर तसेच दुचाकी अॅक्टीव्हा असल्याचे कथन केले आहे. या उलट सामनेवालाचे निशाणी क्र.१७ वर त्याचे वैयक्तिक मालमत्ताचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अर्जदारचे शिक्षण बी.कॉम पर्यत झाल असुन तो असिस्टंट ऑफिसर म्हणून नोकरी करतो. तसेच सामनेवाला याने असे कथन केले आहे की, तो सध्या Welassure या कंपनीमध्ये ऑफिस असिस्टंट म्हणून नोकरीस आहे, त्याला दरमहा २१,७२५/- इतका पगार आहे. याउलट सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार ही नर्स म्हणून नोकरी करत असून तिला १६ ते २० हजार रुपये दरमहा इतका पगर आहे. सामनवालाने त्याच्या प्रतिज्ञापत्रासोबत त्याचे आधारकार्ड, त्याची पगार स्लीप, अर्जदारची पगार स्लीप व सामनेवालाल्याचे आईचे पगार बील दाखल केलेली आहेत.

<u>मुद्दा क्र. १ ते ६ साठी -</u>

११. मुख्य अर्ज, प्रस्तुत अर्ज, म्हणणे व पटलावर दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाले हे पती पत्नी आहेत याबाबत दोन्ही पक्षात वाद नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांच्यात पती पत्नी हे नाते आजही कायम आहे याबाबत देखील वाद नाहीत. त्याचप्रमाणे सदर विवाह संबंधातून अर्जदार व सामनेवाला यांना एकही अपत्य नाही. याबाबत देखील दोन्ही पक्षात वाद नाही. घरगुती हिंसाचार कायद्याचे कलम २३ चे अर्जाचा

विचार करता अर्जदाराने प्रथम दर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्रामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की, समानेवालाने तिला तीच्या चारित्र्यावर संशय घेवून ती सासरी नांदत असतांना तिचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. सामनेवाला हा अर्जदारला नेहमी तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ व मारहाण करत असे. सामनेवाला हा अर्जदारच्या छोटया मोठया गोष्टींवर नेहमी निबंर्ध घालत असे. सामनेवाला हा अर्जदारला अमानविय वागणूक देवून तिला सतत शारिरीक व मानसिक त्रास देत असे. दिनांक ११/१०/२०२४ पासून सामनेवालाने अर्जदारचा कोणतेही कारण नसतांना त्याग केलेला आहे व तिच्या उदनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. याउलट सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार ही स्वतःच्या इच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार ही हट्टी स्वभावाची आहे. अर्जदार ही कोणतीही गोष्ट मानून समजून घेत नव्हती. सामनेवाला क्र.१ सोबत अर्जदारला संसार करायचा नव्हता, तिचे लग्न मनाविरुध्द झाले होते म्हणून कोणतेही सबळ कायदेशीर कारण नसतांना अर्जदार दिवाळीच्या वेळी तिच्या चुलत भावा बरोबर दिनांक ११/११/२०२३ रोजी तिच्या माहेरी निघून गेली आहे. अर्जदार बरोबर संसार सुखाचा व्हावा म्हणून सामनेवाला याने अनेक प्रयत्न केले आहेत, परंतु अर्जदारला संसार करायचा नाही तसेच तिला माहेरी जाण्यास कोणतेही सबळ कारण नाही. सामनेवालावर त्यांच्या आई व वडीलांची जबाबदारी आहे. याउलट अर्जदार ही सुशिक्षत असून ती सुखम हॉस्पीटल करंजाडे येथे स्टफ नर्स म्हणून नोकरी करत असून तिला दर महा १६,४२८/- इतका पगार आहे. तिला उपजिविकेचे साधन आहे. त्यामुळे तिला अन्न, वस्त्रासाठी पोटगीची कोणतीही आवश्यकता नाही. सा.वाला. याची अर्जदाराला पोटगी देण्याची ऐपत नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१२. सामनेवाला याने अर्जदारच्या उदरनिर्वाहाची व पालनपोषणची कोणतीही सोय केलेली नाही. घरगुती हिंसाचार कायद्यामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे हे सुध्दा हिंसाचार या व्याख्येत बसते. अभिलेखावरील सर्व कागदपत्रे तसेच दोन्ही पक्षांची कथने पाहता सामनेवाले यांने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहासाठी काही रक्कम दिली असे कुठेही दिसून येत नाही. तसेच सामनेवाले याची अर्जदारला सांभाळण्याची जबाबादारी असतांना त्याने ती जबाबदारी पार पाडलेली नाही यावरुन अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१३. अर्जदार ही सामनेवालाची पत्नी आहे. सामनेवालाने पती या नात्याने त्याची अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असतांना ती जबाबदारी टाळलेली आहे. सामनेवालाचे असे कथन आहे की, अर्जदार ही सुशिक्षीत असून तिला नोकरी

आहे. सामनेवालाने सुखम हॉस्पीटल करंजाडे यांच्याकडील पगाराची स्लीप अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर पगार स्लीपचे अवलोकन केले असता, ती स्लीप नोव्हेंबर २०२२ या महिन्याची असल्याचे दिसून येते. अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज सन २०२४ मध्ये दाखल केलेला आहे. सदर पगार पत्रक हे नोव्हेंबर २०२२ चे असल्यामुळे त्यावरुन अर्जदार संध्या देखील सदर हॉस्पीटलमध्ये स्टाफ नर्स म्हणून नोकरी करत असेल असे अनुमान काढता येणार नाही. परंतु अर्जदार ही यापुर्वी नोकरी करत होती ही बाब लक्षात घेता यईल. अर्जदाराने नि.१५ वर तिचे मालमत्ता व जबाबदाऱ्या याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यामध्ये तिचे शिक्षण १० वी पर्यंत झाल्याचे व तिला उत्पन्नाचे साधन नसल्याबाबत शपथेवर कथन केले आहे. तसेच सध्या ती तिच्या माहेरी राहत असल्याचे शपथेवर कथन केले आहे. याउलट अर्जदाराचे असे कथन आहे की, सा.वाला हा वेल्सस्पन कंपनी परेल येथे नोकरीस आहे. सा.वालावर अर्जदार शिवाय इतर कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे सामनेवालाची अर्जदारला पोटगी देण्याची ऐपत आहे. सामनेवालाने त्यांच्या शपथ पत्रामध्ये त्याचे उत्पन्न कसे आहे त्याचा सविस्तर तपशिल दिलेला आहे. सामनेवालाने दाखल केलेल्या पगार पत्रकांवरुन सामनेवालाला उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते. सामनेवाल्याचे असे कथन आहे की, त्याच्यावर आई वडीलांची जबाबदारी आहे. सामनेवालाने दाखल केलेल्या माहे ऑक्टोबर २०२४ च्या पगार पत्रकाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सामनेवालाचा २१,७२५/- इतका आहे. सामनेवालाने त्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्याला नोकरी असल्याचे मान्य केलेले आहे. सामनेवालाचे शिक्षण देखिल बी.कॉम पर्यंत झालेले आहे. यावरुन सामनेवालाला उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते.

१४. अर्जदाराने प्रस्तूत अर्जात अंतरीम पोटगी म्हणून १५,०००/- रूपये मिळावी अशी मागणी केली आहे. वरील सर्व परिस्थिती लक्षात घेता अर्जदारास निश्चितपणे प्रस्तुत प्रकरण चालविण्यासाठी तसेच न्यायालयीन कामकाज करणेकरीता खर्चापोटी पैशाची गरज आहे. अर्जदाराने अंतरिम पोटगी प्रतिमहिना रक्कम रूपये १५,०००/- प्रत्येकी अशी मागणी केली आहे. परंतू सदर मागणी सद्य स्थितीत अवाजवी दिसून येत आहे. अर्जदार व सामनेवाले यांचे उत्पन्नाचे स्त्रोत, राहणीमानाचा दर्जा, महागाई, वयोमान तसेच सामनेवालाचे प्रतीज्ञापत्रातील कथन लक्षात घेता सामनेवालाने अर्जदार हिला दरमहा रूपये ३,०००/- अंतरीम पोटगी देणे उचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. त्याचप्रमाणे अर्जदारची मागणी तात्पुरता संरक्षण आदेश, नुकसान भरपाई, घर भाडयाची रक्कम हे मिळण्या बाबतचा आदेश या मागण्यांचा विचार अर्जाचा अंतिम सुनावणीचा वेळी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर करणे उचित होईल त्यामुळे मी मुद्दा क्र.३ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.६ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रूपये ३,०००/ - (रूपये तीन हजार मात्र) अंतरीम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून दयावी.

३. सामनेवाले क्र.१ यांना आदेशित करण्यात येते की, वरीलप्रमाणे अंतरिम पोटगी दर महिन्याच्या १० तारखेच्या आत अर्जदारास देण्यात यावी.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2025.11.21 17:03:20 +0530

**(डी. एस. खोत)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - २१/११/२०२५.